# नि.क्र. ५ वरील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २, कलम १५१ अन्वये तात्पुरता स्वरुपाचा मनाई हुकुम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

**वादीचे अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे** –

२. वादीने सदरचा दावा प्रतिवादीविरुध्द कायमचा मनाई हुकुम मिळणेबाबत केलेला आहे. मौजे रिसोड, ता. रिसोड, जि. वाशिम येथील DRG १० भुखंड क्र.८९ पुर्व–पश्चिम ८० फूट, उत्तर–दक्षिण २५ फुट एकूण आकार २,००० चौ.फु. (१८५.८०६० चौ.मी.) त्यापैकी बांधकाम क्षेत्र पुर्व–पश्चिम ४७ फुट, उत्तर–दक्षिण २० फुट, उरलेला भाग रिकामी जागा आहे. जिच्या चतुःसिमा पुढीलप्रमाणे –

| | | |
|---|---|---|
| पुर्वेला | – | पारस ट्रेडर्सची साईट, |
| पश्चिमेला | – | रिसोड ते हिंगोली रस्ता, |
| दक्षिण | – | प्रतिवादींची साईट, |
| उत्तरेला | – | पारस ट्रेडर्सचे दुकान |

३. पश्चिम साईटवर समोरील विभाजन तिची साईट नंबरी मालमत्ता क्र.नगर परिषद, रिसोड च्या मुल्यांकनानुसार ३८० आहे. वादीने स्थापत्य अभियंता श्री. जिरवणकर यांनी काढलेल्या दावा मिळकतीचे बांधकाम स्पष्ट परिस्थिती दाखविण्यासाठी नकाशा दाखल केला आहे. नकाशा हा दाव्याचा भाग आहे. दावा मिळकत रिसोड येथे आहे. त्यास या नंतर वाद मिळकत म्हणून संबोधले जाईल.

४. मुळचा संपत किसन फुफाटे हा वाद मिळकतीचा मालक आणि ताबेदार होता. वादी त्याच्या कुटूंबातील सदस्यासह वाद मिळकतीत राहतो. वादी व त्याचा भाऊ राजेश बन्सीलाल निरबान यांनी संयुक्तपणे दि.३०/११/१९८८ रोजी नोंदणीकृत खरेदीखताआधारे वाद मिळकत रु.५०००/– विकत घेतली. दोघेही संयुक्त मालक झाले. त्यानंतर दि.२७/०२/२००४ रोजी वादीने त्याचा भाऊ राजेशकडून नावावर

वाद मिळकतीमधील अर्धा हिस्सा नोंदणीकृत खरेदीखताने रु.२८,०००/– मध्ये विकत घेतला. त्याचा रसद क्र.१५९४/२००४ असा आहे. त्यामुळे, वादी हा वाद मिळकतीचा मालक झाला असून वाद मिळकत ही त्याच्या कायम ताब्यात आहे. वादीने सदर मिळकतीत बांधकाम केलेले असून नकाशानुसार वाद मिळकत ही पुर्व–पश्चिम ४७ फुट, उत्तर–दक्षिण २० फुट अशी दाखविली आहे. दावा मिळकत ही हिरव्या रंगाने पुर्व–पश्चिम ८० फुट, उत्तर–दक्षिण २५ फुट A, B, C, D या अक्षराने दर्शविलेली आहे. वादीचा वाद मिळकतीवर सतत ताबा आहे. वादीचे नाव महसूल अभिलेख व नगर परिषदमधील अभिलेखामध्ये नोंद आहे. वादीने दाव्याच्या मालमत्तेबाबत रिसोड येथील कर भरला आहे. प्रतिवादीला वाद मिळकतीवर कोणताही अधिकार नाही.

५. वादीचे पुढे कथन असे की, विश्वनाथ काशिनाथ तायडे यांनी संपत किसन फुफाटे यांच्याकडून वाद मिळकतीच्या दक्षिणेकडून जागा विकत घेतली होती. विश्वनाथ काशिनाथ तायडे हा मयत झाला असून प्रतिवादी क्र.१ हा त्याचा मुलगा व प्रतिवादी क्र.२ ही त्याची पत्नी आहे. नकाशात दाखविल्याप्रमाणे विश्वनाथ काशिनाथ तायडे याने कायमस्वरुपाचे बांधकाम केले असून त्याच्या सिमा आखलेल्या आहेत. प्रतिवादीला कोणताही अधिकार व हक्क नसतांना प्रतिवादींनी वाद मिळकतीच्या दक्षिण दिशेला जबरदस्तीने ताबा करण्याचा प्रयत्न करत आहे. दि.०२/१०/२०२३ रोजी सायंकाळी ६ वाजताच्या दरम्यान वादी व त्याचे कुटूंब वाद मिळकतीमध्ये आले असता दोन्ही प्रतिवादी वाद मिळकतीमधील खुल्या जागेत असलेल्या जागेत आले व टीन शेड टाकण्याचा प्रयत्न करत होते. वादी व त्याच्या मुलाने प्रतिवादी यांना विनंती केली की, या जागेत नासधूस करु नका. त्यावर प्रतिवादीने वादीला धमकावून अश्लील भाषेत शिवीगाळ केली व जीवाने मारण्याची धमकी दिली. वादी पोलीस स्टेशन, रिसोड येथे तक्रार दाखल करण्याकरीता गेला असता त्यांनी वादीला दावा हा दिवाणी स्वरुपाचा असल्याने न्यायालयात जाण्यास सांगीतले. वादीची सकृतदर्शणी केस असुन न्यायाचा समतोल वादीच्या हक्कात आहे व वादीला त्वरीत तात्पुरता मनाई हुकुम न मिळाल्यास त्याचे कधीही न भरुन निघणारे नुकसान होईल त्या कारणाने वादीने तात्पुरता मनाई हुकुम करण्यात यावा अशी विनंती केली.

६. प्रतिवादीने नि.क्र.१७ वर प्रस्तुत अर्जास म्हणणे व दाव्यास कैफियत दाखल करुन अर्जास विरोध दर्शविलेला आहे. हे म्हणणे मान्य आहे की, विश्वनाथ काशिनाथ तायडे हा प्रतिवादी क्र.१ चे वडील होते. विश्वनाथ काशिनाथ तायडे यांनी संपत किसन फुफाटे याचेकडून वाद मिळकतीच्या दक्षिणेकडून जागा विकत घेतली होती. तसेच प्रतिवादी क्र.१ हा विश्वनाथ काशिनाथ तायडे याचा मुलगा असून प्रतिवादी क्र.२ ही त्याची पत्नी आहे. प्रतिवादीचे अधिकचे कथन असे आहे की, विश्वनाथ काशिनाथ तायडे हे दि.२०/१०/२०२१ रोजी रिसोड येथे मयत झालेले आहेत. त्यांनी संपत किसन फुफाटे याच्याकडून रिसोड येथील वार्ड क्र.६ मधील भू.क्र. DRG १० मधील खुली जागा लांबी पुर्व–पश्चिम ४० फुट रुंदी दक्षिण–उत्तर २५ फुट एकूण क्षेत्रफळ १००० चौ.फुट जागा ही नोंदणीकृत खरेदी खताने दि.०६/०२/१९९६ साली विकत घेतली आहे. सदर खरेदीचा रसद क्र.२०५/१९९६ हा आहे. जागेची नोंद महसूल दफ्तरी विश्वनाथ तायडे यांच्या नावाने झालेली आहे. त्यानंतर पुन्हा विश्वनाथ तायडे यांनी दि.२४/०२/१९९६ रोजी वार्ड क्र.६ मधील भूखंड क्र. DRG १० मधील खुली जागा लांबी पुर्व–पश्चिम ४० फुट, रुंदी दक्षिण–उत्तर २५ फुट एकूण क्षेत्रफळ १००० चौ.फुट जागा संपत किसन फुफाटे याच्याकडून नोंदणीकृत खरेदी खताने विकत घेतलेली आहे. त्या खरेदी खताचा रसद क्र.५९६/१९९६ हा आहे. खरेदी खताप्रमाणे विश्वनाथ काशिनाथ तायडे यांच्या नावाने महसूल दफ्तरी वरील जागेची नोंद झालेली आहे. अशाप्रकारे विश्वनाथ काशिनाथ तायडे हा एकूण २००० चौ. फुट जागेचा मालक व ताबेदार होता. विश्वनाथ काशिनाथ तायडे यांनी २००० चौ.फुट जागेपैकी १००० चौ.फुट जागा प्रतिवादी क्र.१ विजय तायडे याच्या नावाने करुन दिली आहे. सदर प्रतिवादी क्र.१ च्या जागेचा नगरपरिषद असेसमेंट नक्कलमध्ये ३८२ हा क्रमांक असून विश्वनाथ काशिनाथ तायडे याच्या जागेचा न.प.मा.क्र.३८१ हा आहे. त्याप्रमाणे विश्वनाथ काशिनाथ तायडे यांच्या नावाने नगरपरिषद, रिसोड येथे असेसमेंट रजिस्टरला नोंद झालेली आहे. विश्वनाथ काशिनाथ तायडे यांनी दि.०६/०२/२००८ रोजी वरील २००० चौ.फुट जागेची नोंदणीकृत चुक दुरुस्ती दस्त सुध्दा २०२१ पर्यंत वरील जागेचा सर्व कर नगरपरिषद कार्यालयात भरलेला आहे. सन २०२१ नंतर वरील जागा क्र.३८१ प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या ताब्यात व मालकीत आहे. वारसा हक्काने

मालमत्ता क.३८१ ही प्रतिवादी क्र.१ व २ हेच मालक व ताबेदार आहेत. त्यांनी वडीलोपार्जित जागेत घर बांधले आहे. ते त्यांच्या कुटूंबासह राहतात. मालमत्ता क्र.३८१ मध्ये विश्वनाथ यांनी घर बांधलेले आहे.

७. प्रतिवादी क्र.१ ने त्यांच्या जागेच्या उत्तर दिशेला झाडे लावली आहेत. तसेच प्रतिवादी क्र.१ ने त्याच्या जागेच्या उत्तर दिशेला रिकाम्या जागेत टीन खोके उभी केली आहेत. त्यामध्ये वेल्डींग व्यवसाय व टी–सेंटर हा व्यवसाय चालू केला असून त्या व्यवसायात प्रतिवादी त्याच्या कुटूंबाचा उदरनिर्वाह चालवित आहे. प्रतिवादीची रिकामी जागा वादीला बेकायदेशीर रित्या ताब्यात घ्यायची आहे. त्यामुळे वादीने सदरचा दावा व तात्पुरता मनाई हुकूमाचा अर्ज दाखल केला आहे. दावा मिळकतीत वादीने बांधकाम केलेले आहे. वादीने वाद मिळकतीवर बांधकाम करण्यापूर्वी नगरपरिषद कार्यालयात बांधकामाची परवानगी काढलेली नाही. त्याचप्रमाणे वादीने वाद मिळकतीवरील बांधकाम करतांना मंजूर नकाशा सुध्दा घेतलेला नाही. वादीने कायद्याचे उल्लंघन करुन वाद मिळकतीवर अवैध बांधकाम केलेले आहे. वाद मिळकतीवर प्रतिवादीने कोणताही अडथळा निर्माण केलेला नाही. वादीचा दावा मुदतीत दाखल केलेला नाही. वादी व प्रतिवादी एकमेकांचे शेजारी आहेत. प्रतिवादीला शारीरिक, मानसिक व आर्थिक त्रास व्हावा अशा हेतुने वादीने खोटा, बनावटी व काल्पनिक स्वरुपाचा दावा दाखल केला आहे. वादी हा स्वच्छ हाताने आलेला नाही. त्याने ख–या बाबी लपवून ठेवलेल्या आहेत. जर वादीला तात्पुरता मनाई हुकूम दिला तर वादी प्रतिवादीच्या घरासमोर असलेली रिकामी जागा ताब्यात घेऊ शकतो, असे झाल्यास प्रतिवादीचे कधीही न भरुन निघाणारे नुकसान होईल. सदरचा दावा व नि.क्र.५ चा अर्ज हा रक्कम रुपये ५० हजाराच्या खर्चासह खारीज करण्याची विनंती केली.

८. वादीचे विद्वान विधिज्ञ श्री.पी.एस. देशमुख यांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादींचे विद्वान विधिज्ञ श्री.एस.पी. भारती यांनी नि.क्र.२५ वर त्यांचा लेखी युक्तीवाद दाखल केला आहे. दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले.

९. प्रस्तुत अर्जावरुन खालील मुद्दे (वादप्रश्न) विचारार्थ उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसासह पुढील प्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे (वादप्रश्न) | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीच्या लाभात प्रथमदर्शनी बाजू (prima facie case) आहे काय ? | होय. |
| २. | पुराव्याचा समतोल (Balance of convenience) कोणाच्या बाजुने आहे ? | वादीच्या बाजूने |
| ३. | अर्ज नामंजुर झाल्यास कोणाचे नुकसान (irreparable loss) होणार आहे ? | वादीचे |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

**<u>का र ण मि मां सा</u>**

१०. प्रस्तुत अर्जातील कथनाच्या पृष्ठार्थ वादीच्या वतीने अभिलेखावर नि.क्र. ४ सोबत खरेदीखत क्र.१५९४/२००४ दि.२७/०२/२००४, फेरफार क्र.३१३२ दि.०३/०२/२०२२, असेसमेंट दि.११/०९/२०१७ व २८/०९/२०२३, नकाशा व कर पावती अशा कागदपत्रांच्या छायांकित प्रती दाखल केल्या आहे. वादीने खालील न्यायनिवाडयावर विश्वास दर्शविला आहे,

१०–अ **Santoo and others *Vs. Jagannath and others on* 8 *May*, 2003, 2003 *CJ* (*ALL*) 1090 *Hon'ble High Court of Allahabad,*** it is stated in Section 38 that, Perpetual injunction when granted 4. The second appeal was admitted on this question alone by the following order :– "The substantial question of law involved in the second appeal is that the lower Appellate Court seems to have acted illegally in taking the view that the sale deed executed by Sahabdin who has been found to be the owner of the property in dispute in favour of the appellant had not been proved notwithstanding the statement of Sahabdin himself proving

the said sale deed." 5. After considering the argument of the learned counsel, I am of the view that there is no illegality in the finding of the first Appellate Court that Sahabdin has not proved the sale deed in accordance with law.

११. याउलट प्रतिवादींनी नि.क्र.१९ सोबत दि.१२/०४/२०२३ रोजीची कर पावती, गट क्र.३/८९/अ चा सातबारा उतारा विश्वनाथ काशिनाथ तायडे याचे मृत्यू प्रमाणपत्र, चुक दुरुस्तीचा लेख दि.०६/०६/२००८ दाखल केला आहे. प्रतिवादीने खालील न्यायनिवाडयावर विश्वास दर्शविला आहे,

११–अ ***Sundar Raj Vs. Vijayendra Kumar and others on 11 January**, 2001, 2001(1)**KARLJ**468,* it is observed in para 11 that, Moreover in the case on hand, the Trial Judge in my opinion has committed a patent error in granting an injunction even on merits. It is the case of the plaintiff that the free air and light is affected on account of the said construction. The learned Judge himself in para 10 notices that no construction is put up in the sites owned by the plaintiff. There is no record to show that flow of air and light is prevented. Having come to this conclusion the Trial Court ought not to have granted an injunction. An interim order is granted to arrest an imminent danger or injury to the contesting party. Any interim order has to be an aid to the main relief but when there is no imminent danger or injury, no temporary injunction can be granted by the Court. Therefore, the Court even on merits has committed a legal error which require my interference in this order.

११–ब ***Sri Parthasarathy D S/O Doraisamy vs ) Smt.***

***C. Maria Sahaya Sasikala on 9 March, 2023***, it is observed in para 16 that, In the light of the above law laid down by Hon'ble High Court of Karnataka, in order for this Court to grant permanent injunction restraining the defendant No.1 and 2 from putting up construction on their suit schedule B property without leaving the setback and contrary to the sanctioned plan at Ex. P4, this court has to see whether the plaintiff has proved that, as a neighbor, the plaintiff will suffer some special damage such a obstruction to free flow of air or light to his own property, as a result of the construction being put up by the defendant No.1 and 2.

११-क ***Jagdish Chander Vs. Tasleem on 12 January, 2023,*** it is observed in para 44 that, the aforesaid plea of the Ld. Counsel for the defendant is also not tenable since it has already been noted above that the defendant has not taken the objections of non-joinder of necessary party in his written statement filed before the Ld. Trial Court and the said observation had been given by the then Ld. ADJ while deciding the RCA No.05/2010 and thereafter the matter was remanding back to the Ld. Trial Court for deciding the matter afresh and thereafter the impugned judgment came to be passed against which the present appeal, which is also a first appeal, has been filed by the plaintiff therefore in my considered view RCA No.61428/16 Jagdish Chander vs. Tasleem Page No.22/28 the observation given the then Ld. ADJ in RCA No. 05/2010 qua the suit being bad for non-

joinder of necessary parties in not binding upon this Court since this court is also exercising its powers as the first appellate court over the judgment passed by the Ld. Trial Court.

**<u>मुद्दा क्र. १ ते ३ करीता –</u>**

१२. मुद्दा क्र.१ ते ३ एकमेकांशी संलग्न असल्यामुळे चर्चेची पुनरावृत्ती टाळण्याकरिता ते एकत्रितरित्या चर्चेस घेण्यात आले आहे. या ठिकाणी, प्रस्तुत अर्जाचा विचार करतांना वादीच्या हक्कात प्रथम दर्शनी बाजू, न्यायाचा समतोल व मनाई अर्ज नाकारल्यास होणारे नुकसान याचा विचार करणे आवश्यक आहे. प्रथमदर्शनी बाजू म्हणजे वादीचा दावा व दाव्यासोबत जोडलेली कागदपत्रे, परस्परांचे कथन व म्हणणे यावरुन वादीच्या हक्कात मागणी मंजूर करण्याइतपत प्रथमदर्शनी पुरावा होय. दोन्ही पक्षाचे कथन ऐकले. अभिलेखाचे एकंदरित अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी व प्रतिवादी हे ऐकमेकांचे शेजारी आहेत.

१३. वादीच्या वतीने युक्तीवादा दरम्यान वाद मिळकत ही वादी व त्याचा भाऊ नामे राजेश यांनी संयुक्तिक रित्या दि.३०/११/१९८८ रोजी नोंदणीकृत खरेदीखताने रु.५०००/– मध्ये संपत किसन फुफाटे याच्याकडून विकत घेतली. त्यानंतर वादीने वाद मिळकतीमधील अर्धा हिस्सा त्याच्या भावाकडून दि.२७/०२/२००४ खरेदी खत क्र.१५९४/२००४ रु.२८,०००/– मध्ये विकत घेतला. तेव्हापासून वादी हा मालक असून त्याचा वाद मिळकतीमध्ये सतत ताबा आहे. वादीने वाद मिळकतीमध्ये बांधकाम केलेले आहे व त्याच्या नावे महसूल अभिलेखावर नोंदणी झालेली आहे. प्रतिवादी क्र.१ चे वडील व प्रतिवादी क्र.२ चे पती यांनी वाद मिळकतीच्या दक्षिणेकडील बाजूचा प्लॉट संपत किसन फुफाटे याच्याकडून विकत घेतला होता. वादीने प्रतिवादी क्र.१ चे वडील यांनी कायमस्वरुपी बांधकाम केलेले असून त्याच्या सिमा आखलेल्या आहेत. प्रतिवादींना कोणताही हक्क नसतांना ते वाद मिळकतीच्या दक्षिण दिशेला जबरदस्तीने ताबा करण्याचा प्रयत्न करत आहेत.

१४. याउलट प्रतिवादींच्या वतीने लेखी युक्तीवाद दाखल करण्यात आला

असून त्यांचे म्हणणे असे की, वादी हा नगर परिषद कार्यालय, रिसोड येथे नौकरीवर होता. वादीने त्याचे घर बांधकाम करतांना बांधकामाची परवानगी काढली नसून दाव्यात दाखल केलेली नाही. वादीने बांधकामाचे सिमांकन करुन मंजूर नकाशा दाव्यात दाखल केलेला नाही. वादीने दाव्यात दाखल केलेला नकाशा हा खाजगी अभियंत्यांचा असून तो सरकारी नाही. वादीने मुनसीपालटी अॅक्टमधील टाऊन प्लॅनमधील तरतुदीचे पालन न करता बांधकाम केलेले असल्यामुळे त्याला मनाई हुकूम मागविता येत नाही. वाद मिळकत ही नगरपरिषद हद्दीत येते. नगरपरिषद हद्दीत अतिक्रमणाचा मुद्दा निर्माण झाला तर, नगरपरिषद ही संस्था कार्य करते. वादीने नगरपरिषदेला लेखी स्वरुपात कळविणे अनिवार्य होते. तसेच नगरपरिषद मुख्याधिकारी यांना दाव्यात आवश्यक पक्ष म्हणून समाविष्ट करणे गरजेचे होते. आवश्यक लोकांना पक्ष न केल्यामुळे दावा व अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे. वादी व प्रतिवादी यांच्या जागा वाद मिळकतीच्या शेजारी आहेत. त्यांच्या जागेच्या मध्ये जुनी झाडे असून त्यामध्ये अतिक्रमण करण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. वादी व प्रतिवादींच्या जागेच्या मध्ये एक बोळ आहे, ती प्रतिवादीच्या मालकीची आहे त्यामुळे प्रतिवादीने अतिक्रमण केले किंवा नाही हा प्रश्न निर्माण होत नाही. सदर बोळीची जागा वादी हडप करण्याच्या तयारीत आहे. वादी हा त्याच्या जागेत राहत आहे. परंतु वादीला जर तात्पुरता मनाई हुकूम दिला तर तो त्याचा गैरवापर करुन प्रतिवादींची जागा ताब्यात घेऊ शकतो. वादीचा अर्ज हा प्रथमदर्शनी नसून समतोल हा वादीचे बाजूने नाही.

१५. दोन्ही बाजुकडील युक्तीवाद, कथने व प्रथमदर्शीनी सादर करण्यात आलेले कागदपत्राचे आधारे प्रस्तुत अर्जाचे विवेचन करावे लागेल. याठिकाणी, कळीचा मुद्दा म्हणजे वादी हा दावा मिळकतीतील क्षेत्रावर मालकी हक्काने ताबा ठेवून आहे का हा आहे. वादी हा त्याच्या कथनाच्या पृष्ठयर्थ महसूल दफ्तरीचे कागदपत्र याचा आधार घेतो. या उलट प्रतिवादी देखील महसूल दफ्तरीचे कागदपत्रांचा आधार घेतो. या अनुषंगे सदर कागदपत्रांचे याठिकाणी पाहणी व छानणी करणे क्रमप्राप्त ठरते. याठिकाणी प्रथमतः वादीचे नोंदणीकृत खरेदीखत क्र.१५९४ चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने दि.२७/०२/२००४ रोजी त्याच्या भावाकडून नामे राजेश बन्सीलाल निरबान

सर्वे नं.१० मधील प्लॉट क्र.८९ मधील रु.२८,०००/– मध्ये खरेदी केलेले आहे तसेच खरेदी खत क्र.१६४५ दि.३०/११/१९८८ रोजी वादी व त्याचा भाऊ नामे राजेश यांनी संपत किसन फुफाटे याच्याकडून रु.५०००/– मध्ये एकूण क्षेत्रफळ २००० चौ.फुट विकत घेतल्याचे दिसून येते. सुचि क्र.२ मध्ये संपत किसन फुफाटे याच्याकडून वादी व त्याच्या भावाने दि.३०/११/१९८८ रोजी प्लॉट क्र.८९ मध्ये एकूण २००० चौ.फुट विकत घेतल्याचे दिसून येते तसेच फेरफार क्र.३१ व ३२ चे अवलोकन केले असता असे दिसते की, भुखंड क्र.८९ मधील एकूण २००० चौ.फु. खुली जागा वादी व त्याचा भाऊ यांनी दि.३०/११/१९८८ रोजी रु.५०००/– मध्ये विकत घेतली. असेसमेंट नक्कल वर्ष २०१२–१३ ते २०१५–१६ वार्ड क्र.३ जुना मालमत्ता क्र.३८० व वादीचे नाव नमूद केले आहे. तसेच नगर पालीका रिसोड यांची कराची पावतीमध्ये रस्ता/३८० २०२३ ते २०२४ मध्ये वादीने १७७६ रुपये दि.२८/०९/२०२३ रोजी भरल्याचे दिसून येते.

१६. याउलट प्रतिवादींच्या वतीने नगरपरिषद रिसोड येथील कराची पावती दाखल केली असून रस्ता ३/३८१ सन २०२३–२४ दि.१२/०४/२०२३ रोजी प्रतिवादी क्र.१ च्या वडीलांनी रु.८७४६/– भरल्याचे दिसून येते. नगरपरिषद रिसोड येथील कराची पावती दाखल केली असून रस्ता ३/३८२ सन २०२३–२४ दि.१२/०४/२०२३ रोजी प्रतिवादी क्र.१ ने रु.२४२५/– भरल्याचे दिसून येते. फेरफार दुरुस्ती लेख दाखल केला आहे, त्यामध्ये प्लॉट क्र.८९ मधून दि.२२/०३/१९९६ रोजी संपत किसन फुफाटे याने विश्वनाथ काशीराम तायडे याचेकडून रु. २०,०००/– ला विकत घेतल्याचे दिसून येते. गावनमुना ७/१२ उतारा गट क्र.३/८९/अ वर प्रतिवादी क्र.१ च्या वडीलांच्या नावे १.८६ व वादीच्या नावे १.८६ आर संयुक्त सामाईक क्षेत्र दाखविले आहे. फेरफार क्र.३४ प्रतिवादी क्र.१ चे वडील नामे विश्वनाथ काशिनाथ तायडे यांनी संपत किसन फुफाटे याच्याकडून DRG 10 मध्ये प्लॉट नं.८९ मध्ये पुर्व–पश्चिम ४० फुट, उत्तर–दक्षिण २५ फुट एकूण १००० चौ.फु. म्हणजेच ९२.९० चौ.मी. ही जागा रु.२०,०००/– दि.२२/०३/१९९६ रोजी विकत घेतली असल्याचे नमूद केले आहे. तसेच चुक दुरुस्तीचा लेख रसद

क्र.१४६४/२००८ दि.०६ जुन २००८ त्यामध्ये वार्ड क्र.६ मध्ये खुली जागा ज्याची लांबी ४० फुट व रुंदी २५ फुट एकूण क्षेत्रफळ १००० चौ.फु. म्हणजेच ९२.९० चौ.मी. हे प्रतिवादी क्र.१ चे वडीलांनी संपत किसन फुफाटे याच्याकडून विकत घेतल्याचे दिसून येते.

१७. प्रस्तुत अर्जात समाविष्ट असलेला न्यायाचा समतोल कोणाच्या बाजुने आहे व प्रस्तुतचा अर्ज नामंजुर केल्यास वादीचे किती अपाय/नुकसान होईल याबाबीसह अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादींचे किती अपाय/नुकसान होईल याबाबीचा विचार करणे देखील गरजेचे आहे. अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रे यावरुन तौलानिक बाजु ही प्रथमदर्शनी वादीच्या बाजुने आहे. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार सदरचा दावा हा मुदतीत नाही, तसेच वादीने त्याचे घर बांधण्याकरीता नगरपरिषदेची परवानगी घेतली नाही परंतु ती बाब अंतीम न्यायनिर्णयाच्या वेळी व त्याअनुषंगे पुराव्याच्या आधारे ठरविणे योग्य होईल. अशा परिस्थितीत अर्ज नामंजुर केल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब न्यायाचा समतोल सुध्दा वादीच्या बाजुने असल्याचे दिसुन येते. वरील विवेचनावरुन व परिस्थितीचा विचार करता वादप्रश्नातील तिन्ही बाबी हया वादीच्या हक्कात असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. याठिकाणी, वरील विवेचनावरुन खरेदीखत व सातबारा पत्रकी वादीच्या नावे भुखंड ८९ मध्ये २००० चौ.फु. क्षेत्राची नोंद दिसून येते. अभिलेखावर दाखल महसूल दफ्तरीचे कागदपत्रे म्हणजेच फेरफार, खरेदीखत व करपावती यावरुन वादी हा दावा मिळकती क्षेत्राचा मालक व ताबेदार असल्याची बाब प्रथमदर्शनी अभिलेखावर आलेली आहे, त्यामुळे अनुकूलतेचा समतोल देखील वादीच्या बाजूने आहे. प्रतिवादीने दाखल केलेल्या न्यायनिवाडयामधील वस्तुस्थिती व हातातील प्रकरणामधील वस्तुस्थिती ही भिन्न असल्याकारणाने आदराने ते येथे लागू होत नाहीत. वादीने मागीतल्याप्रमाणे तात्पुरता मनाई हुकूमाचा आदेश जर त्याच्या हक्कात पारीत करण्यात आला तर, प्रतिवादीचे फार काही नुकसान होईल असे दिसून येत नाही. मात्र, नामंजूर झाल्यास वादीचे नुकसान/हानी होण्याची शक्यता आहे. सबब, वरील वादप्रश्न क्र. १ ते ३ यांचे निष्कर्ष नोंदवित आहे.

**वादप्रश्न क्र. ४ –**

१८. सकृतदर्शनी बाजू, न्यायाचा समतोल आणि अपरिमीत नुकसान या तिन्ही बाबी वादीच्या लाभात असल्याचे दिसून येते. वरील वाद प्रश्नाच्या अनुषंगाने नोंदविलेल्या निष्कर्षांचा विचार करता मी मुद्दा क्र.४ चे निष्कर्षाकरीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. नि.क्र.५ चा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांना या तात्पुरत्या मनाई हुकूमाद्वारे वादीच्या दावा मिळकतीवरील ताब्यास पुढील आदेशापावेतो त्याने स्वतः किंवा त्याचे मार्फत इतर कोणीही, कोणत्याही प्रकारे हरकत अथवा अडथळा निर्माण करु नये, असे आदेशीत करण्यात येत आहे.

३. सदर अर्जाचा खर्च मुळ दाव्यात ठरविण्यात यावा.

पिठासनावरुन उद्घोषीत करण्यात आले.

स्वा/–
(प्रतिभा मा. कांबळे)
दि. १८/०७/२०२४. २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
रिसोड.

<u>Certificate</u>

I affirm that, the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Prashant K. More, (Grade III) |
| Court | :- | $2^{nd}$ Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Risod |
| Date:- | :- | 18/07/2024 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | :- | 18/07/2024 |
| Judgment/Order uploaded on | :- | 22/07/2024 |